आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
४ जुलै २०२६ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्र्यांच्या हस्ते राजस्थानात जोधपूर विमानतळाचं तसंच एकात्मिक तेलशुद्धिकरण आणि पेट्रोरासायनिक कारखान्याचं उद्घाटन

- केंद्र सरकारने कांद्याच्या खरेदी भावात केली १३ टक्के वाढ

- केंद्रीय गृहमंत्रालयाकडून २३ पाकिस्तानी नागरिक दहशतवादी म्हणून घोषित

- काँगोमधे इबोला विषाणू संसर्गाचे १ हजार ५०२ रुग्ण सापडले/ ४७३ रुग्णांचा मृत्यू

**आणि**

- महाराष्ट्रात संततधार पावसामुळे जनजीवन प्रभावित

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज राजस्थान आणि गुजरातच्या दौऱ्यावर आहेत. राजस्थानात जोधपूर इथं राज्यपाल हरिभाऊ बागडे, केंद्रीय मंत्री गजेंद्र सिंग शेखावत, आणि मुख्यमंत्री भजनलाल शर्मा यांनी प्रधानमंत्र्यांचं स्वागत केलं. राजस्थानात जोधपूर इथल्या विमानतळाच्या नवीन इमारतीचं उद्घाटन प्रधानमंत्र्यांनी केलं. ४८० कोटी रुपये खर्चाच्या या विमानतळाची वार्षिक प्रवासी क्षमता २० लाख आहे. आधुनिक तंत्रज्ञान आणि सोयीसुविधा यांच्याबरोबरच शहराच्या ऐतिहासिक वारशाची छाप या नवीन इमारतीत पहायला मिळते. सर्वसामान्यांच्या आवाक्यात विमान प्रवास यावा याकरता सुरु केलेल्या उडान योजनेच्या सुधारित आवृत्तीचं उद्घाटनही प्रधानमंत्र्यांच्या हस्ते झालं.

राजस्थानात बलोत्रा इथं ग्रीनफील्ड एकात्मिक तेल शुद्धिकरण आणि पेट्रोरासायनिक कारखान्याच्या परिसराचं तसंच इतर पायाभूत सोयी सुविधांचं लोकार्पण आणि पायाभरणी प्रधानमंत्र्यांच्या हस्ते झाली. राजस्थान राज्यसरकारमधे नोकरी मिळालेल्या ५४ हजार तरुणांना नियुक्तीपत्रांचं वाटप मोदी यांच्या हस्ते होणार आहे.

आज संध्याकाळी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी गुजरातमधे सेमीकंडक्टर प्रकल्पाचं उद्घाटन करणार आहेत.

**<><><><><>**

उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांनी आज विशेष मतदारयादी पुनिरीक्षण मोहिमेअंतर्गत आपला गणना अर्ज दाखल केला.

<><><><><>

केंद्र सरकारने कांद्याचा खरेदी दर १३ टक्क्यांनी वाढवला आहे. हा दर १ हजार ८७५ रुपये प्रति क्विंटलवरून २ हजार १२५ रुपये प्रति क्विंटल केला आहे. ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्रालयाने ही माहिती दिली. सुधारित खरेदी दर आजपासून लागू झाला आहे. या सुधारित खरेदी दरामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांना चांगला परतावा मिळेल आणि त्याचबरोबर साठा उभारणीच्या प्रयत्नांनाही बळ मिळेल, असं मंत्रालयाने नमूद केलं आहे.

कृषी आणि शेतकरी कल्याण विभागाच्या २०२५-२६ च्या दुसऱ्या आगाऊ अंदाजानुसार, कांद्याचं उत्पादन ३०७ लाख मेट्रिक टनांहून अधिक होण्याचा अंदाज आहे. महाराष्ट्र, मध्य प्रदेश आणि गुजरातमध्ये सध्याचा साठा पुरेसा असून, कांद्याच्या तुटवड्याची कोणतीही चिन्हं सध्या दिसत नाहीत, असंही मंत्रालयाने सांगितलं. देशात कांद्याचा सरासरी किरकोळ दर ३१ रुपये प्रति किलो इतका आहे. कांद्याची निर्यातही सामान्य असून, या वर्षी जून महिन्यात सुमारे १ लाख ५० हजार मेट्रिक टन कांद्याची निर्यात झाली आहे.

<><><><><>

स्वामी विवेकानंद यांच्या पुण्यतिथीनिमित्त उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आदरांजली वाहिली आहे. “स्वामी विवेकानंद यांची आत्मविश्वासपूर्ण, प्रगल्भ आणि संवेदनशील भारताची संकल्पना आजही देशाच्या वाटचालीस दिशा देत असल्याचं राधाकृष्णन यांनी सामाजिक माध्यमावरील आपल्या संदेशात म्हटलं आहे. “भारतीय संस्कृती, अध्यात्म आणि राष्ट्रीय जाणीवेला जागतिक स्तरावर ओळख मिळवून देण्यात स्वामी विवेकानंदांचं योगदान अद्वितीय आहे.” त्यांची प्रज्ञा आणि प्रेरणादायी विचार आजही लाखो तरुणांना मार्गदर्शन करत असल्याचं प्रधानमंत्र्यांनी म्हटलं आहे. “तरुणाईला सकारात्मकतेची शिकवण देणारे स्वामी विवेकानंद भारतीय संस्कृतीचे भाष्यकार आणि युगप्रवर्तक आहेत” अशा शब्दात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्वामी विवेकानंदांना अभिवादन केलं आहे.

<><><><><>

भारत आणि इस्राएल यांच्यातला द्विपक्षीय गुंतवणूक करार आजपासून लागू झाला आहे. नवी दिल्लीत गेल्यावर्षी या करारावर स्वाक्षऱ्या झाल्या होत्या. हा करार दोन्ही देशांमधले आर्थिक संबंध आणखी दृढ करण्याच्या तसंच गुंतवणुकीसाठी सुरक्षित वातावरण निर्माण करण्याच्या दिशेनं एक महत्त्वाचं पाऊल आहे, असं अर्थ मंत्रालयानं म्हटलं आहे.

<><><><><>

बेकायदेशीर कृत्य प्रतिबंधक कायद्यानुसार केंद्रीय गृहमंत्रालयानं २३ पाकिस्तानी नागरिकांना दहशतवादी म्हणून घोषित केलं आहे. हे लोक जैशे मोहम्मद, लष्कर ए तैय्यबा सारख्या दहशतवादी संघटनांशी संबंधित असून जम्मू काश्मीरमध्ये घुसखोरी, शस्त्रं पुरवणं आणि हल्ल्यांची योजना आखणं यामध्ये त्यांचा हात आहे. या घोषणेमुळे राष्ट्रीय तपास संस्थेसारख्या सुरक्षा संस्थांना या लोकांची मालमत्ता जप्त करता येईल आणि बँक खाती गोठवता येतील जेणेकरून त्यांच्याकडून होणारी शस्त्र खरेदी थांबता येईल.

<><><><><>

अयोध्येतल्या श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र न्यासानं प्रशासकीय आणि आर्थिक बाबींसंबंधी चर्चा करण्यासाठी येत्या सोमवारी सदस्यांची बैठक बोलावली आहे. न्यासाला प्राप्त होत असलेल्या देणग्यांच्या मोजणीचा तपास करत असलेल्या विशेष तपास पथकानं नोंदवलेल्या निरीक्षणांबाबतही या बैठकीत चर्चा होईल. याशिवाय, सरचिटणीस चंपत राय आणि विश्वस्त डॉ अनिल मिश्रा यांनी सादर केलेल्या राजीनाम्यांसह राम मंदिराच्या आगामी व्यवस्थापनाशी संबंधित बाबींचाही बैठकीच्या विषयपत्रिकेत समावेश आहे.

<><><><><>

कांगो या देशात इबोला विषाणू संसर्ग झालेले १ हजार ५०२ रुग्ण सापडले असून या संसर्गामुळे ४७३ जणांचा मृत्यू झाला आहे. या देशात संसर्गाची स्थिती गंभीर असल्याचं जागतिक आरोग्य संघटनेनं म्हटलं आहे. सध्या ६२८ रुग्ण विलगीकरणात असून २२९ जण या संसर्गातून बरे झाले आहेत अशी माहिती कांगोच्या आरोग्य संस्थेनं दिली आहे. विषाणू संसर्ग कांगोच्या इतर प्रांतातही पसरत असल्याचं वृत्त आहे. युगांडामध्येही या संसर्गाचे २० रुग्ण आढळले आहेत. या भागात सुरु असलेल्या सशस्त्र संघर्षामुळे रुग्ण शोध आणि उपचारात अडथळे येत असल्याचं जागतिक आरोग्य संघटनेनं म्हटलं आहे.

<><><><><>

इराणचे सर्वोच्च नेते दिवंगत अयतुल्ला सैयद अली खामेनी यांच्या अंत्यसंस्कार कार्यक्रमाची तयारी तेहरानमधे सुरु आहे. हा कार्यक्रम ६ दिवस चालणार असून इराणचे अध्यक्ष मसऊद पेझेश्कियान, संसद अध्यक्ष मोहम्मद बघेर घालिबाफ, परराष्ट्र व्यवहार मंत्री अब्बास अराघची, रिवोल्यूशनरी गार्डचे प्रमुख अहमद वाहिदी या मान्यवरांनी दिवंगत नेत्याला आदरांजली वाहिली.

भारताच्या वतीनं बिहारचे राज्यपाल लेफ्टनंट जनरल सैयद अता हसनैन, आणि परराष्ट्र व्यवहार राज्यमंत्री पवित्रा मार्घरिटा यांनी खामेनी यांना आदरांजली वाहिली. रशिया, चीन, अफगाणिस्तान, इत्यादी देशांचे प्रतिनिधी आदरांजली कार्यक्रमात सहभागी झाले आहेत. येत्या ९ जुलै रोजी मशाद शहरात खामेनी यांच्या पार्थिवावर दफन संस्कार केले जातील. त्यानंतर ४० दिवस इराणमधे राष्ट्रीय दुखवटा लागू राहील.

**<><><><><>**

क्रोएशिया ग्रॅण्ड बुद्धिबळ स्पर्धेच्या रॅपिड प्रकारात भारताचा ग्रॅण्डमास्टर आर प्रज्ञानंद यानं धडाकेबाज खेळ केला. काल झालेल्या तीनही सामन्यांत  विजय मिळवत त्याने फ्रान्सच्या अलीरेझा फिरौझा याच्याशी बरोबरी साधत स्पर्धेत संयुक्त आघाडी घेतली आहे. प्रज्ञानंदने इव्हान सारिक,  बॉगदन डॅनियल डियाक आणि अनिश गिरी यांचा पराभव केला.

दरम्यान, विद्यमान विश्वविजेता डी गुकेश याने कालचे तीनही सामने बरोबरीत सोडवत १० गुणांपर्यंत मजल मारली. तो आता संयुक्तरित्या आघाडीवर असलेल्या खेळाडूंपेक्षा अवघ्या दोन गुणांनी मागे आहे. यापुढचे, सामने १८ फेऱ्यांच्या ब्लिट्झ प्रकारचे असून यातच अंतिम विजेता ठरणार आहे.

**<><><><><>**

फिफा विश्वचषक स्पर्धेच्या ३२ फेऱ्यांच्या साखळी सामन्यात कोलंबियानं घानाचा १-० असा पराभव करत पुढच्या फेरीत प्रवेश केला. जॉन एरिआस यानं १४ व्या मिनिटाला गोल करत संघाला विजय मिळवून दिला. त्याआधी माजी विजेत्या अर्जेन्टिनानं कॅबो वेर्दचा ३-२ असा पराभव केला. लिओनेल मेस्सीनं अर्जेन्टिनाच्या विजयात महत्वपूर्ण योगदान दिलं. याशिवाय, इजिप्त आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात झालेल्या सामन्यात १-१ अशा गोल बरोबरीनंतर झालेल्या पेनल्टी शूटआऊट मध्ये इजिप्तनं ऑस्ट्रेलियाचा ४ विरुद्ध २ गोलनं पराभव केला.

**<><><><><>**

आंतरराष्ट्रीय सहकार दिवसानिमित्त आज उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन आणि अमित शाह यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.  या  शेतकरी, महिला तसंच छोटे उद्योजक यांना बळ देण्यात सहकारी संस्था महत्वाची भूमिका बजावतात असं उपराष्ट्रपतींनी त्यांच्या समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. भारताची परंपरा, सर्वंकष बळ आणि आत्मनिर्भरता याचा पाया सहकारिता आहे, असं केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. प्रधानमंत्री मोदी यांच्या नेतृत्वात सहकारी संस्था भरारी घेत आहेत असंही त्यांनी पुढे म्हटलं आहे.

<><><><>

बंगालच्या उपसागराचा वायव्य भाग आणि लगतच्या क्षेत्रात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे ओदिशाच्या अनेक जिल्ह्यात जोरदार ते अती मुसळधार पाऊस होत आहे. भारतीय हवामान विभागाने हीच स्थिती पुढील दोन ते तीन दिवस कायम राहण्याची शक्यता वर्तवली असून संपूर्ण राज्यात पावसाचा जोर आणखी वाढण्याचा अंदाज व्यक्त केला आहे.

<><><><>

भारतीय हवामान विभागाने आज गुजरात, कोकण, गोवा, मध्य महाराष्ट्र, पश्चिम मध्य प्रदेश आणि ओडिशा या भागांसाठी मुसळधार ते अति मुसळधार पावसाचा, तसंच काही ठिकाणी अत्यंत मुसळधार पावसाचा 'रेड अलर्ट' जारी केला आहे. पुढील दोन दिवसांत पूर्व राजस्थान, पूर्व मध्य प्रदेश, कर्नाटक किनारपट्टी, तेलंगणा आणि विदर्भात मुसळधार ते अति मुसळधार पावसाची शक्यता आहे.

महाराष्ट्रात अनेक जिल्ह्यात पावसाची संततधार आहे. मुंबई आणि उपनगरात संततधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झालं आहे. मुंबई,  ठाणे, पालघर, रायगड, पालघर, रत्नागिरी आणि  सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी हवामान विभागानं येत्या सोमवारपर्यंत रेड अलर्ट जारी केला आहे. रेड अलर्ट लक्षात घेत नवी मुंबई, ठाणे, भिवंडी, पालघर, कल्याण आणि डोंबिवलीमधल्या शाळांना पूर्ण दिवस तर मुंबईतल्या शाळांना दुपारच्या सत्रात सुट्टी देण्यात आली. राज्यात अनेक ठिकाणी पाणी साठ्यांमध्ये वाढ होत आहे, तर अनेक नद्यांचं पाणी वाढल्यानं धरणं भरत आहेत.

<><><><>